# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE


---

गुरुवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२१

विनियम १०/२०२१

अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संलग्नीत महाविद्यालय/संस्थामध्ये शिक्षकांची (ग्रंथपाल/शारिरीक शिक्षण व AICTE अभ्यासक्रम वगळून) सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३A) वरुन प्राध्यापक (स्तर १४) वरील स्थाननिश्चिती च्या अनुषंगाने पदोन्नती ला मान्यता देण्याबाबतची कार्यपध्दती.

ज्याअर्थी केंद्रिय शासनाने सातवा वेतन आयोगाची शिफारसीच्या अनुषंगाने विद्यापीठ व महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षकांच्या सेवाशर्ती व वेतन लागू केले आहे, व विद्यापीठ अनुदान आयोगने विनियम -२०१८ निर्गमित केले आहे व त्यावर महाराष्ट्र शासनाने दिनांक ८ मार्च, २०१९ व १० मे, २०१९ च्या शासन निर्णय क्र. misc-2018 C.R. 56/18/Uni-I व NCTE वीनियम-२०१४ व २०१७ बाबत शासन निर्णय क्र. बी.एड. ४६१७/प्र.क्र. २०८(१)/मशि-२, दि. ३.१२.२०१८ नुसार मान्य केले आहे. यानुसारच यु.जी.सी. विनियम-२०१८ संबंधात विद्यापीठाने निदेश क्र. ८/२०१९, १४/२०१९, १७/२०१९ विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत निर्गमित केले आहे आणि शिक्षण अभ्यासक्रम संबंधात NCTE वीनियम-२०१४ व २०१७ साठी निदेश क्र. ११/२०२० निर्गमित केले आहे.

आणि

ज्याअर्थी उपरोक्त सहयोगी प्राध्यपकांना (स्तर -१३A) वरुन प्राध्यापक (स्तर १४) पदावर स्थाननिश्चिती म्हणुन पदोन्नती देण्याबाबत सदर शासन निर्णयात तरतूद करण्यात आली आहे व या आधारावर API/PBAS ई. नुसार त्यांचे मुल्यमापन करण्याकरीता निदेश क्र. १७/२०१९ मध्ये प्रपत्रे तयार करुन प्रसिध्द करण्यात आले आहे.

आणि

ज्याअर्थी निदेश क्र. १८/२०१९ मध्ये दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. ७ नुसार सदर कार्यवाही करावयाची आहे व परिच्छेद क्र ७.३. I अंतर्गत संबंधीत शिक्षकांच्या पात्रतेच्या दिनांकाच्या ३ महिने पुर्वी पदोन्नती बाबत संबंधित प्राचार्यांना अर्ज सादर करावयाचे आहे.

आणि

ज्याअर्थी महाविद्यालयांनी उपरोक्त परिच्छेद अंतर्गत महाविद्यालयाला अर्ज प्राप्त झाल्यापासुन ६ महिन्याच्या आंत हि विहित कालावधीत कार्यवाही पुर्ण करावयाची आहे.

आणि

ज्याअर्थी विद्यापीठाचे विद्या परिषदेने दि. ४.१२.२०२० च्या सभेत विषय क्र. ९६ (अ) अन्वये सहयोगी प्राध्यापकांची (स्तर -१३A) प्राध्यपक (स्तर १४) म्हणुन पदोन्नती बाबत निवड समितीने केलेल्या शिफारसीला विद्यापीठाने मान्यता प्रदान करुन प्राध्यापक म्हणुन मान्यतेचे पत्र देण्यात यावे, असे निर्देश दिले आहे. त्यानुसार विद्यापीठाने महाविद्यालयांकडून प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रपत्रे तयार केले आहे. त्यानुसार महाविद्यालयाने उपरोक्त सर्व संबंधित निदेश व प्रपत्रे लक्षात घेवून प्रस्ताव विनियमव्दारे सादर करावयाचे आहे, या संबंधात कार्यपध्दती अधिष्ठाता मंडळाने दि. ६.५.२०२१ च्या सभेत विषय क्र. ३६ अन्वये, मान्य करुन व्यवस्थापन परिषदेला कायदा कलम ७५(१) (एफ) मान्यतेसाठी सादर केले आहे,

त्याअर्थी, व्यवस्थापन परिषद. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम ï २०१६ च्या कलम ७५(१) (एफ) अंतर्गत खालील प्रमाणे विनियम विहीत करतील.

(१) सदर विनियम ñअशासकीय अनुदानित व विना अनुदानित संलग्नीत महाविद्यालय/संस्थामध्ये संलग्नीत महाविद्यालय/संस्थामध्ये शिक्षकांची (ग्रंथपाल/शारिरिक शिक्षण व AICTE अभ्यासक्र वगळून) सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३A) वरुन प्राध्यापक (स्तर १४) वरील स्थाननिश्चिती च्या अनुषंगाने पदोन्नती ला मान्यता देण्याबाबतची कार्यपध्दती साठी विनियम १०/२०२१ म्हणुन संबोधण्यात येतील.

(२) सदर विनियम व्यवस्थापन परिषदेने मंजुर केल्याच्या तारखेपासुन अंमलात येईल.

(३) वेगळा संदर्भ नसेल तर-

अ) ñशिक्षकÒ म्हणजे विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम २(६१) नुसार संलग्नित महाविद्यालयातील, सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३A) पदावरील कार्यरत शिक्षक व अनुदानित व विना अनुदानित अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेले मान्यता प्राप्त नियमित शिक्षक

ब) ñमहाविद्यालयÒ म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेले अनुदानित अथवा विना अनुदानित अशासकिय महाविद्यालय किंवा संस्था

(४) निवड समितीची सभा आयोजनापुर्वी महाविद्यालयाने विद्यापीठाकडून आवश्यक प्रपत्रे महाविद्यालया विभागाकडून किंवी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन प्राप्त करावी.

(५) प्राचार्यांने १५ दिवसांत अर्जदार शिक्षक पात्र असल्यास विद्यापीठाकडे मा. कुलगुरुंचे प्रतिनिधी/पॅनल घेण्याकरिता प्रस्ताव सादर करावा.

(६) निवड समितीची मागणी झाल्यानंतर १५ दिवसांच्या आंत विद्यापीठाने निवड समितीवरील प्रतिनिधी/पॅनल द्यावे.

(७) कार्यवाही करतांना निदेश क्र. ८/२०१९, १४/२०१९, १७/२०१९, व ११/२०२० मधील असलेली संबंधित सर्व बाबी व तरतुदींचे पालन करण्यात यावे. शासन निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ च्या परिच्छेद क्र ७.३. I व त्यावर दुरुस्ती शासन निर्णय दिनांक १० मे, २०१९ च्या परिच्छेद क्र ७.३. VI.i नुसार प्रकरण निकालात काढण्यासाठी व उशीर होऊ नये यासाठी तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(८) अनुदान प्राप्त पदासाठी सहसंचालक (उच्च शिक्षण), अमरावती विभाग, अमरावती आणि/किंवा शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे. (जर शासनाचे आदेश निर्देश असल्यास) व त्याची प्रत प्रस्तावासोबत सादर करावे.

(९) निवड समिती विद्यापीठ अनुदान आयोग विनियम -२०१८ च्या परिच्छेद क्र. 5.1 VII (निदेश क्र. ८/२०१९) व शासन निर्णय दि. १० मे, २०१९ (निदेश क्र. १४/२०१९) नुसारच गठीत करण्यात यावी.

(१०) संबंधित असलेले निदेश क्रमांक ८/२०१९, १४/२०१९, मधील तरतुदीनुसार समितीच्या बैठकीची गणसंख्या (quorum) पूर्ण असावे. तसेच समितीच्या सभेला विहित केलेल्या विषय तज्ञांची उपस्थिती आवश्यक आहे. तसे न आढळल्यास समितीच्या शिफारसी ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. याव्यतीरिक्त बैठकीत सहसंचालक (उ/शि) किंवा त्याचा प्रतिनिधी (तज्ञ) ची उपस्थिती अनिवार्य आहे.

(११)निवड समितीच्या शिफारसी त्याच दिवशी मा. कुलगुरु नामीत/पॅनल वरील असलेल्या प्रतिनिधी यांना हस्तांतरीत करण्यात यावेत, व सदर प्रतिनिधीने ७ दिवासांच्या आंत विद्यापीठात सादर करावे.

(१२) निवड समितीची सभा झाल्यानंतर ७ दिवसांच्या आंत महाविद्यालयाने प्रस्ताव विद्यापीठाला मान्यतेसाठी सादर करावी. तथापी अनुदानित पदासाठी सह. संचालक (उच्च शिक्षण) अमरावती यांनी मान्यता प्रदान केल्यानंतर ७ दिवसांच्या आंत महाविद्यालयाने प्रस्ताव विद्यापीठाला सादर करावे.

(१३) समितीच्या शिफारशींना प्र-कुलगुरुंची मान्यता कायदा-२०१६ च्या कलम १३(१३) अंतर्गत प्राप्त करुन घ्यावी त्याशिवाय शिफारशी वैध ठरणार नाहीत. समितीच्या शिफारशी प्र-कुलगुरु लेखी कारणे नोंदवून अमान्य करु शकतील.

(१४) प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या तारखेपासून १ महिन्याच्या आंत निवड समितीच्या शिफारसीवर प्र-कुलगुरुंच्या निर्णय महाविद्यालयांना कळविण्यात येईल.

(१५) निवड समितीच्या शिफारसीवर प्र-कुलगुरुंच्या प्राप्त निर्णयावर महाविद्यालयांने १५ दिवसांच्या आंत पुढील कार्यवाही करावी व त्याची प्रत त्वरीत विद्यापीठाला अग्रेषित करावी. जर यामध्ये विलंब झाल्यास त्यासाठी महाविद्यालय/संस्था जबाबदार राहील.

(१६) सदर विनियम दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ च्या सभेत व्यवस्थापन परिषदेने विषय क्र. २०४ अन्वये विहित केले आहे.

-------------***--------------